## भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

( दुपार )

जा.क्र.३४३ / माहिती कक्ष / वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक ०३/०४/२०१७

**१) रेतीने भरलेला ट्रक तपासणी करीता थांबवीले असता वाहन हयगयीने व निष्काळजीपणे चालवुन बॅरीकेट तोडुन पळुन गेल्याने गुन्हा नोंद . :–**

दिनांक ०१/०४/२०१७ चे २०.३० वा. दरम्यान यातील फिर्यादी हे आपले कर्तव्यावर हजर असतांना यातील आरोपी वाहन चालकाने त्याचे ताब्यातील रेतीने भरलेला ट्रक रायल्टी तपासणी कामी थांबवीण्याचा इशारा केला असता ताब्यातील वाहन हयगयीने, भरधाव वेगाने व निष्काळजीपणे चालवुन चेक पोस्ट समोर लावलेल्या बॅरीकेटला धडक मारुन बॅरीकेट तोडुन पळुन गेल्याने सरतर्फे फिर्यादी पोना. गुल्हाने पो. मु. भंडारा यांचे रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन पवनी येथे कलम २७९ भांदवि. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. पुढील तपास पोहवा. मस्के पोलीस स्टेशन पवनी हे करीत आहे.

**२) काळी पिवळी वाहन चालकांच्या निष्काळजीपणामुळे चालवुन समोरुन धडक मारुन अपघाताची सुचना न देता पळुन गेल्याने गुन्हा नोंद . :–**

दिनांक ०२/०४/२०१७ चे १२.१० वा. दरम्यान यातील फिर्यादी प्रमोद विठठल उम्राडे वय ५० वर्ष, रा. इंदीरा नगर टीबी हॉस्पीटलचे मागे प्लॉट नं. ६९ नागपुर पो. स्टे अजनी ह. मु. सहायक संचालन आरोग्य सेवा कृष्ठ रोग मोठा बाजार हनुमान मंदीर जवळ भंडारा हा टाटा सुमो गाडी क्र. एमएच १२ ८०२४ ने जात असता यातील आरोपी चालकाने आपल्या ताब्यातील काळी पिवळी वाहन निष्काळजीपणे चालवुन फिर्यादीचे टाटा सुमो गाडीला डोंगरला बसस्टॉप येथे समोरुन धडक मारुन नुकसान केल्याने अपघाताची सुचना न देता पळुन गेल्याने फिर्यादी यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन तुमसर येथे कलम २७९,४२७ भांदवि. सहकलम १३४(ब)मोवाका अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. पुढील तपास पोहवा. कळंबे पोलीस स्टेशन तुमसर हे करीत आहे.

**३) वैनगंगा नदीचे लहान पुलीया जवळ इसमाचा प्रेत मिळुन आले . :–**

दिनांक ०२/०४/२०१७ चे १९.३२ वा. पुर्वी यातील मृतक शामराव किसण मते वय ६२ वर्ष, रा. मांडगी पो. स्टे तुमसर यांचे प्रेत दिनांक ०२/०४/२०१७ चे १६.३२ वा. मृत अवस्थेत वैनगंगा नदीचे लहान पुलीया जवळील हणुमान मंदीरा जवळ मिळुन आल्याने एमओ सामाण्य रुग्णालय भंडारा यांचे अभिप्राया वरुन पोस्टे भंडारा येथे कलम १७४ जाफौ. अन्वये मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास सपोनी. रायपुरे पोलीस स्टेशन भंडारा हे करीत आहे.

**४) मोटार वाहन कायदयाखाली कारवाई. :–**

दिनांक ०२/०४/२०१७ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी मोटार वाहन कायदयाखाली १२४ प्रकरणांची नोंद करण्यात आलेली असून त्यापैकी अवैध प्रवासी ०१, तीन सिटर वाहनांवरती ११ केसेस व तसेच ईतर वाहनांवरती ११२ केसेस करण्यात आलेल्या आहेत.

03-4

(प्रश. व्ही. कुलकर्णी )
पोलीस उपअधिक्षक (गृह)
भंडारा
दुरध्वनी.क्र. ९९८७३८५४०५

PSD

पोलीस अधीक्षक कार्यालय भंडारा (म. रा.)

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा
वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

प्रत, संगणक कक्ष, भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.